नांदेड व लातूर जिल्ह्याच्या कृषी मालाच्या बाजारपेठेचा तुलनात्मक अभ्यास (२०११-१२ ते २०२०-२१)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

स्वामी श्रीकांत नंदकुमार

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. पी. आर. गाठे

बाबासाहेब देशमुख महाविद्यालय उमरी
ता.उमरी जि. नांदेड

मार्च : २०२२

प्रस्तावना (Introduction)

भारत हा कृषीप्रधान देश असून जवळपास ७० टके लोक शेती व्यवसाय करतात म्हणजेच बहुतांश लोकांचा रोजगार हा शेती व्यवसायाशी निगडित आहे. आजही राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३५ ते ४० टक्के उत्पन्न कृषी क्षेत्रातून मिळते. भारतीय जनतेला अन्नधान्य व उद्योग संस्थेला कच्चा माल पुरविण्याची जबाबदारी शेतीवर आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची संपूर्ण मदार शेतीवरच अवलंबून असल्यामुळे शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हणतात. तेव्हा खऱ्या अर्थाने देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावायचा असेल तर शेतीचया उत्पादनात वाढ करून शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळवून देणे आवश्यक आहे. आज आपला देश अन्नधानच्या बाबतीत स्वयूंपर्ण झालेला आहे. शेती उत्पादनात अन्नधान्ये, कापूस, ताग, भुईमुग व ऊस यांचे प्रमाण अधिक आहे. महारष्ट्र हे राज्य अनेक क्षेत्रात आघाडीवर आहे. जसे उद्योग, सहकार तसेच ते कृषी उत्पादनाच्या बाबतीतही आघाडीवर असून ज्वारी, बाजरी, गहु, सूर्यफुल, भुईमुग, ऊस, केळी, कापूस यांचे उत्पादनाचे प्रमाण अधिक आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्र हे एक प्रमुख क्षेत्र आहे. देशाच्या आर्थिक विकासात व राष्ट्रीय उत्पन्नवाढीत शेतीक्षेत्रातून निर्माण होणाऱ्या उत्पादनाला अनन्नसाधारण असे महत्त्व आहे. देशातील बहुतांशी शेतकरी सध्या शेतीक्षेत्र हे एक उपजिविकेचे साधन जरी विकसित करीत असले तरी अलीकडील काळात शेतीक्षेत्रात व्यापारी दृष्टिकोन विकसित होत आहे. १९९१ नंतर देशाने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाच्या काळात फळे, फुले, भाजीपाला व बागायती पिकांचे उत्पादन यासाठभ शेती उत्पादनवाढीवर विशेष भर देण्यात येत आहे. या दृष्टिकोनातून भारतातील शेतमालाचे उत्पादन व बाजारपेठेत विक्रीसाठी येणारे उत्पादन यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

संशोधन समस्या (Research of Problem)

भारताने आपल्या संविधाना समाजवाद सदृष्य आर्थिक धोरण स्वीकारले असल्याचा जाहीरनामा मार्गदर्शक तत्त्वात स्पष्ट केला असला तरीही १९९१ मध्ये मात्र भांडवलशाही पद्धतीला अनुसरत नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. जागतिकिकरण, खाजगीकरण आणि

उदारीकरण ही या नव्या आर्थिक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे ठरली. भारताचा समावेश गॅट या करारनाम्यात झाल्यानंतर प्रायोजित करण्यात आलेल्या डंकेल प्रस्तावातील ट्रीप्स आणि ट्रीम्स या अटी भारतातील कृषी विषयक धोरणावर मूलगामी परिणाम करणाऱ्या होत्या. या अटी भारतात अजूनही पूर्णपणे लागू करण्यात आल्या नसल्या तरीही त्या टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार आहेत. या सर्व धोरणांचा परिणाम कृषी मालाच्या विपणनासाठी निर्माझ करण्यात आलेली व्यवस्थ्ञ ा चालू ठेवावी की नाही असा मूलभूत प्रश्न उपस्थित करणारा कायद्याचा मसुदा राज्यशासनाने गेल्या दशकाच्या प्रारंभीच विचाराधीन ठेवाला. या सर्व बाबी लक्षात घेता शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने काय आवश्यक आहे व काय नाही याचा अभ्यास कृषी मालाच्या विपणनाच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते. हे लक्षात घेऊन संशोधकाने संशोधनाचा प्रस्तुत विषय **नांदेड व लातूर जिल्ह्याच्या कृषी मालाच्या बाजारपेठेचा तुलनात्मक अभ्यास (२०११-१२ ते २०२०-२१)** असा निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of the Research)

संशोधन समस्येचे विधान व संरचनात थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन होणे गरजेचे असते. हे नेमकेपण संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येते. उद्दिष्टे संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते.

कोणतेही संशोधन हाती घेत असताना संशोधक काही प्रश्नांवर भर देतो. संशोधक प्रश्नांची रचना वाक्यानुसार करता. काही संशोधक उद्दिष्टांनाच प्रश्नरूपाने मांडतात असे करणे टाळणे पाहिजे. त्यामुळे उद्दिष्टांचे पुनः पुन्हा मांडणी होते. अभ्यासाच्या स्वरूपावरून आधारित संशोधन परिकल्पनेची मांडणी, रचना करतो परिकल्पना या पूर्वी झालेल्या संशोधनातून, सैद्धांतिक रचनेतून उगम पावतात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा अनुशंगाने परिकल्पनांचे स्वरूप निश्चित करू शकतो. त्यामुळे संशोधकास संशोधन परिकल्पना लिहिणे शक्य होते. परिकल्पनेच्या

मांडणीरून संशोधकास त्या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान आहे हे समजते तसेच माहिती संकलन आणि विश्लेषण करण्याची दिशाही समजते. त्यामुळे परिकल्पना ही परिक्षणक्षम असावी, स्पटीकरणक्षम असावी आणि दोन चलांतील सहसंबंध दर्शविणारी असावी.

प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. नांदेड व लातूर जिल्ह्याच्या भौगोलिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. नांदेड व लातूर जिल्ह्याची कृषी विपणनाची आवक प्रवृत्ती अभ्यासणे.
३. नांदेड व लातूर जिल्ह्याची शेतमालाच्या किंमतीची प्रवृत्ती अभ्यासणे.
४. नांदेड व लातूर जिल्ह्याची कृषी विपणन व्यवस्थेत कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका अभ्यासणे.
५. नांदेड व लातूर जिल्ह्याची कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे.
६. नांदेड व लातूर जिल्ह्याची कृषी उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis of Research)

वैज्ञानिक पध्दतीने एखाद्या विषयाचा अभ्यास करत असताना प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे संशोधक सामान्यअनुमान मांडतो हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरत असते. अशा पूर्वानुमानास गृहीतकृत्य वा उपकल्पना म्हणतात. वेबस्टर शब्दकोष १९५६ नुसार गृहितकृत्ये म्हणजे एखादे गृहित धरलेले विधान तत्व किंवा एखादी अट होय. गृहीतकृत्याच्या उपयुक्तेबाबत समाजशास्त्रीय संशोधक व अभ्यासक एल. कोटेन व नॅगेल म्हणतात. चौकशी वा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे वा समस्याचे संभाव्य निराकरण वा उत्तर सुचविल्या खेरिज आपण संशोधन कार्यात पहिले पाऊल देखील उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाबाबतच्या पूर्वज्ञानामुळे सूचतात अशा उत्तराचे जेव्हा विधानामध्ये रुपांतर केले जाते तेव्हा ती उत्तरे गृहीतकृत्ये बनतात.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची काही गृहीतकत्ये खालीलप्रमाणे दिले आहेत.

१. नांदेड व लातूर जिल्ह्याची भौगोलिक स्थिती महत्त्वपूर्ण अशीच आहे.

२. नांदेड व लातूर कृषी विपणनाची आवक दिवसेंदिवस वाढत आहे.

३. नांदेड व लातूरशेतमालाच्या किंमतीमध्ये सातत्य नसून त्यामध्ये चढ उत्तार दिसून येतो.

४. नांदेड व लातूर कृषी विपणन व्यवस्थेत कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका सातत्याने शेतकऱ्यांचे शोषण करणारीच राहिले आहे.

५. नांदेड व लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत योग्य त्या सुविधा दिल्या जातात.

६. नांदेड व लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे स्थान महत्त्वपूर्ण असेच आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of Research)

मनुष्यप्राण्याच्या जीवनात अन्नाचे महत्त्व अनन्नसाधारण असेच आहे. प्रत्येकाला योग्य प्रतीचे जीवन जगण्यासाठी कमीतकमी ३००० कॅलरीजचा दररोज पुरवठा होईल एवढे अन्न आवश्यक असते. जीवनावश्यक सत्त्वे आपणाला शेतीपासूनच मिळतात. वस्त्र व निवारा यांचेही मूळ शेतीतच आहे. त्याशिवाय बऱ्याच उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल हा शेतीमार्फतच पुरविला जातो. या कच्च्या मालाचा पुरवठा वेळच्या वेळी व योग्य प्रमाणात झाल्याशिवाय शहरांतील कारखाने चालणे शक्य नाही. शेतीची भरभराट हा सर्वसाधारण सर्व अर्थव्यवस्थेच्या भरभराटीचा पाया मानला जातो. विशेषःत भारतासारख्या अविकसित देशात शेतीतील चढउतारांप्रमाणे संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीत चढउतार होतात. जेव्हा शेतीचे उत्पादन वाढते तेव्हा राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचाही वेग वाढतो. याउलट दुष्काळामुळे जेव्हा शेती उत्पादन कमी होते तेव्हा राष्ट्रीय उत्पन्नातील वाढही खुंटते असा अनुभव अविकसित देशांना येतो.

भारत हा शेतीप्रधान देश म्हणून अनेक वर्षापासून ओळखला जातो. इ.स. १९५१ पासून आर्थिक नियोजनास प्रारंभ झाला व देशाचे औद्योगिकिकरण वेगाने करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्यात आल्या. तरीसुद्धा आज इतक्यावर्षांनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत असलेले शेतीच महत्त्व जवळपास पूर्वीप्रमाणे कायम राहिल्याचे आढळते. सर्वसाधारणः ग्रामीण विभाग हा सर्वस्वी

शेतीवर अवलंबून आहे असे मानण्यास हरकत नहाी. १९७१ च्या शिरगणतीनुसार ग्रामीण भागात राहणाऱ्य लोकसंख्येचे प्रमाण ८० टक्के आहे. इंग्लंड, अमेरिका यासारख्या पाश्चिमात्य देशांत ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण २१ ते ३० टक्के आहे. यावरून पाश्चिमात्य अर्थव्यवस्थांनी शेतीवरील त्यांचे अवलंबित्व कमी करण्यास कसे यश मिळविले आहे व भारतात ते अद्याप कसे शक्य झाले नाही याची कल्पना येते. त्यामुळे **नांदेड व लातूर जिल्ह्याच्या कृषी मालाच्या बाजारपेठेचा तुलनात्मक अभ्यास (२०११-१२ ते २०२०-२१)** अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

संशोधन पध्दती (Research Method)

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक सर्वेक्षण व अनुभववादी स्वरुपाचे असून यात वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग केला आहे. सांख्यिकीय विश्लेषण पध्दतीचा वापर या संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

संशोधनाच्या माहितीचे स्त्रोत (Sources of Research Information)

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक, अनुभवजन्य क्षेत्रिय निरीक्षणाच्या स्वरुपाचे संशोधन असल्यामुळे संशोधकाने या संशोधनास अनुकूल ठरणाऱ्या अनुभवजन्य पध्दतीची निवड करण्याचे ठरविले आहे. संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलनाच्या विविध मार्गांचा अवलंब करण्यात आला.

संशोधनाची नमुना निवड (Sample Selection of Research)

संशोधनाच्या नमुना निवड पद्धतीचे संभाव्यता नमुना निवड आणि असंभाव्यता नमूना निवड असे दोन प्रकार पडतात.

नमुना निवडीच्या पद्धती

संभाव्यता नमुना निवड

- सरळ यादृच्छित नमुना
- व्यवस्थाबद्ध नमुना
- स्तरीय नमुना
- एकक पुंज नमुना
- क्षेत्र नमुना
- बहुस्तरीय नमुना
- अनुपातित नमुना
- नियमित अंकन नमुना

असंभाव्यता नमुना निवड

- सोयीस्कर नमुना
- कोटा नमुना
- स्नोबॉल नमुना
- स्वनिर्नित नमुना

वरील प्रमाणे नैसर्गिक व सामाजिक संशोधनामध्ये संभाव्यता व असंभाव्यता या नमुना निवड पद्धतीचा उपयोग होत असतो. संभाव्यता ही नमुना निवड पद्धत मूर्त किंवा वैज्ञानिक पद्धतीशी संबंधित आहे. तर असंभाव्यता नमुना निवड पद्धत ही अमूर्त किंवा सामाजिक शास्त्राशी संबंधित आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात असंभाव्यता नमूना निवड पद्धती बरोबरच यादृच्छिक संशोधन पद्धतीचा वेळप्रसंगी उपयोग करण्यात आला येईल.

प्राथमिक स्त्रोताद्वारे माहिती संकलीत करण्यासाठी संशोधकाने नांदेड व लातूर जिल्हे संशोधन कार्यक्षेत्र म्हणून निवडले आहेत. नांदेड जिल्ह्यातील नांदेड १५ व लातूर जिल्ह्यातील १० कृषी उत्पन्न बाजार समितीची निवड केली आहे. यादृच्छिक लॅटरी पद्धतीने प्रत्येक कृषी उत्पन्न समितीमधून १८ या प्रमाणात ४५० शेतकऱ्यांची निवड केली आहे. ५० टक्के म्हणजे २२५ शेतकरी लहान गटातील, २५ टक्के म्हणजे ११३ शेतकरी हे मध्यम गटातील तर उर्वरीत २५ टक्के म्हणजे ११२ शेतकरी हे मोठ्या गटातील आहेत. २५ उत्पन्न बाजार समितीमधून यादृच्छिक (रँडम

सॅम्पलींग) पद्धतीने प्रत्येकी ६ पदाधिकारी या प्रमाणात १५० पदाधिकाऱ्यांची निवड केली. तसेच २५ उत्पन्न बाजार समितीमधून यादृच्छिक (रँडम सॅम्पलींग) पद्धतीने प्रत्येकी ३ पदाधिकारी या प्रमाणात ७५ व्यापाऱ्यांची निवड केली. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने ९ प्रकारची अन्नधान्यामध्ये गहू, ज्वारी, भुईमूग, हरभरा, उडीद, तूर, मूग, सूर्यफुल आणि सोयाबिन या कृषीमालांची निवड नमुना म्हणून केली आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत

माहिती संकलनाचे स्त्रोत

प्राथमिक माहिती संकलन

↓

प्रत्यक्ष निरीक्षण

↓

प्रश्नावली

↓

मुलाखती

↓

अनुसूची

↓

विशिष्टाभ्यास

द्वित्तीय माहिती संकलन

↓

शासकीय अहवाल/प्रकाशन

↓

खाजगी संस्थाचे अहवाल/प्रकाशने

↓

वर्तमान पत्रे/मासिके/पुस्तके

↓

ऐतिहासिक कागद पत्रे

प्राथमिक माहिती संकलन

अभ्यासासाठी निवडलेल्या प्राथमिक माहितीत प्रश्नावलीद्वारे नमुना निवड पद्धतीने नांदेड व लातूर जिल्ह्यातील आवश्यक ती माहिती संग्रहीत केली आहे. त्याच बरोबर उत्तरदात्याकडून माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुसूची व प्रश्नावलीचा आधार घेतला आहे. शेतकरी, पदाधिकारी आणि व्यापारी यांना प्रथम भेट देवून त्यांच्याशी औपचारिक स्वरूपाची चर्चा करण्यात आली व अभ्यासासाठीची संशोधन कार्यासाठीची आवश्यक माहिती संकलित केली जाईल.

द्वित्तीय माहिती संकलन

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक माहिती संकलनाबरोबर द्वित्तीय माहिती संकलनाचा आधार घेण्यात आला आहे. यात कृषी उत्पन्न बाजार समिती संदर्भात केंद्र व राज्य सरकार वेळोवेळी प्रसिद्ध केलेले अहवाल, नांदेड व लातूर आर्थिक पाहणी अहवाल, महाराष्ट्र सांख्यिकीय गोषवारा, आर्थिक समालोचन अहवाल, संशोधन पत्रिका त्याच बरोबर बिदर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, नांदेड व लातूर गॅझेटिअर, स्थलदर्शक नकाशे, गुगल, वेबसाईट, विविध संशोधन पत्रिका, नियतकालीके, मासिके, ग्रंथ व वृत्तपत्र यातून प्रसिद्ध झालेल्या माहितीचा उपयोग प्रबंध लेखनासाठी केलेला आहे. सांख्यिकीय संशोधनात निर्देशांक, शेकडा प्रमाण, वृद्धीदर, सारणीच्या साधनाचा विशेषतः उपयोग करण्यात येईल.

मुलाखत व अनुसूची

प्रस्तुत संशोधनातील माहिती संकलनाकरिता तयार करण्यात येणारी मुलाखत, अनुसूची, नांदेड व लातूर जिल्ह्यातील उत्तरदात्यांकडून भरून घेतल्यानंतर सदर मुलाखत अनुसूचीची पूर्व तपासणी करून प्रश्नावलीचे मूल्यांकन करण्यात येईल.

माहिती विश्लेषण प्रक्रिया

माहिती संकलित प्रक्रियेनंतर माहितीना अंतिम रूप देताना संकलित माहिती योग्य पद्धतीने प्रक्रिया करून गुणात्मक व संख्यात्मक माहिती वेगळी करून माहितीचे विश्लेषण केले आहे. माहिती विश्लेषण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना अंतिम रूप देण्यासाठी वर्गीकरण, संकेतिकरण, मास्टर चार्ट आलेख, स्तंभालेख, वर्तुळ, सारणी इत्यादींचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitations of Research)

संशोधन करीत असताना विषयाला वस्तुनिष्ठ आणि निपक्ष स्परूप यावे यासाठी संशोधन समस्येची व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते त्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनात पुढील बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१. प्रस्तुत संशोधनासाठी १० वर्षांचा कालावधी निवडला असून यात २०११-१२ ते २०२०-२१ या कालावधीतील अभ्यास करण्यात येईल.

२. संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र नांदेड व लातूर जिल्ह्यापुरते मर्यादित राहील.

३. प्रस्तुत संशोधनात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यापुरते मर्यादित आहे.

प्रकरण पहिले : प्रस्ताविक

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची मांडणी केली असून संशोधनाची उद्दिष्टे तसेच मर्यादा स्पष्ट करण्यात आली आहे. संशोधन विषयाचे महत्त्व व निवडीमागील हेतु स्पष्ट करण्यात आला असून संशोधन गृहीततकांची मांडणी करण्यात आली आहे. संशोधन पद्धतीचा आराखडा, नमुना निवडीच्या तपशीलासह देण्यात आला आहे. नांदेड व लातूर जिल्ह्याच्या कृषी उत्पन्न बाजार समितींची माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाच्या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या संदर्भात झालेल्या संशोधनाचा आढावा याठिकाणी घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : नांदेड व लातूर जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात नांदेड व लातूर जिल्ह्यातील भौगोलिक स्थितीचा आढावा घेत असताना लोकसंख्या, लिंग गुणोत्तर, साक्षरता, कृषी व्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, हवामान, आरोग्य, शिक्षण इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे : नांदेड व लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील कृषी मालाची आवक

प्रस्तुत प्रकरणात नांदेड व लातूर जिल्ह्यातील २५ कृषी उत्पन्न बाजार समितीतील मालाची आवक अभ्यासली जाणार आहे. त्यासाठी आवक चढउत्तारांचे विश्लेषणात्मक अध्ययन, सारणीकरण आणि आलेख इत्यादींचा अवलंब केला जाईल.

प्रकरण पाचवे : नांदेड व लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील कृषी मालाची किंमत

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड व लातूर जिल्ह्यातील निवडलेल्या २५ पंचायत समितीतील ९ प्रकारच्या कृषी मालांच्या इ.स. २०११-१२ ते २०२०-२१ या कालावधीतील किंमतीचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : नांदेड व लातूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सुविधांचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सुविधांचा अभ्यास प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे मांडला आहे. यात नमुना प्रतिसादक शेतकऱ्यांच्या समस्या तसेच व्यापारी व पदाधिकाऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरण हे निष्कर्ष आणि व शिफारशीचे असून संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी आणि शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भग्रंथ

१. एस. डी. कुलकर्णी, इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया, भीष्प प्रकाशन, ठाणे, १९९७
२. आर. के. मुकर्जी, चंद्रगुप्त मौर्य अँड हिज टाइम्स, मोतीलाल बनारसीदास, वाराणसी, १९६८
३. एस. एस. आचार्य, इंडियन अॅग्रीकल्चर पॉलिसी अॅट द क्रॉस रोड्स, रावत प्रकाशन, जयपूर, २०१०
४. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११-१२ ते २०२०-२१
५. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११-१२ ते २०२०-२१
६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, नांदेड जिल्हा, भाग-१ व २ दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई
७. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, लातूर जिल्हा, भाग-१ व २ दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई
८. व्ही.बी.पाटील, *संशोधन पद्धती*, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २०१२
९. ए.एन.भक्कड, *संशोधन पद्धती*, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२
१०. गुरुनाथ नाडगोडे, *सामाजिक संशोधन पध्दती*, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१
११. प्रा.एस.डी.दराडे, *संशोधन पद्धती*, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३
१२. प्रदिप आगलावे, *सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

संशोधक | **मार्गदर्शक**

स्वामी श्रीकांत नंदकुमार

प्राचार्य डॉ. पी. आर. गाठे
बाबासाहेब देशमुख महाविद्यालय उमरी
ता.उमरी जि. नांदेड